
2684

# कांचनकथामाला

भा. गो. काटकर

2



BVBK-0402745

बा०वा.
२६८५.
९।१।८३

कांचन कथामाला भाग २

म. सं. स. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
अ. क्र. २६८५ दिनांक ९।१।८३
विषय बा.वा. ... क्र. ........

# कांचन कथामाला

मा. गो. काटकर

BVBK-0402745

शिल्पा प्रकाशन
५/३, एल.आय.जी. कॉलनी, त्रिमूर्ती नगर, नागपूर-२२.

**प्रकाशन क्र. ७**

**प्रकाशक**

श्याम जडे

*शिल्पा प्रकाशन*

५/३ एल.आय.जी. कॉलनी, त्रिमूर्ती नगर, नागपूर-२२.

**प्रथम आवृत्ती - ५ मे अक्षय तृतिया**

© सर्व हक्क प्रकाशकाधीन

**मुद्रक व संगणक जुळवणी**

*वैभव प्रिंटर्स*

१७, कन्नमवार नगर, वर्धा रोड, नागपूर-२५.

**मूल्य - रूपये १२.००**

**पुस्तके मिळण्याचे ठिकाण -**

*फेमस बुक सेंटर*, १९२, छत्रपती नगर, वर्धा रोड, नागपूर-१५.

# १. चतुर शारदा

एके दिवशी काय झाले, शशांक राजाला बरे वाटेनासे झाले. त्याच्या पोटात दुखू लागले. त्याने राजवैद्याला बोलावणे पाठवले. त्याप्रमाणे राजवैद्य आले. त्याने राजाचे पोट तपासले.

राजवैद्य म्हणाले, "महाराज पोटदुखीवर माझ्यापाशी फार चांगलं औषध आहे. ते घेताच आपणास त्वरीत आराम वाटेल. पण -"

"पण काय वैद्यराज?" राजाने विचारले.

वैद्यराज गंभीरपणे म्हणाले, "ते औषध बैलाच्या दुधाबरोबर घेतलं पाहिजे!"

ते ऐकून राजाला फार आश्चर्य वाटले. तो म्हणाला, "वैद्यराज, तुमच्या सांगण्यात काही चूक तर होत नाही ना? अहो, बैलाचे दूध मिळणे कसे शक्य आहे?"

"नाही महाराज, माझ्या सांगण्यात काहीच चूक झाली नाही! आपण चतुरकाला सांगा. तो फार चतुर आहे. बैलाचे दूध तो खात्रीने घेऊन येईल." असे सांगून वैद्यराज मोठ्या आनंदात निघून गेले.

"गोरगरीबांना फुकट औषध द्या. त्यांच्याकडून पैसे घेऊ नका" अशी राजाज्ञा मोडून वैद्यराज औषधांचे पैसे वसूल करीत होते, ही गोष्ट चतुरकाला कळताच त्याने वैद्यराजाची चांगली कान उघडणी केली होती. त्यामुळे वैद्यराज चतुरकाला पाण्यात पाहत होते. आता बैलाच्या दुधाच्या निमित्ताने चतुरकाला पेचात पकडून त्याची चांगली फजिती करण्याची संधी वैद्यराजाला मिळाली होती. म्हणून ते मोठ्या मिस्किलपणे स्वतःशी

हसत घराकडे गेले होते.

वैद्यराज निघून गेल्यावर शशांक राजाने चतुरकाला बोलावून घेतले आणि तो त्याला म्हणाला. "चतुरक, पोटदुखीवरचे औषध बैलाच्या दुधाबरोबर घेण्यास मला वैद्यराजांनी सांगितलंय्. बैलाचे दूध मला तावडतोब मिळण्याची व्यवस्था कर!"

ते ऐकून, वैद्यराजाने आपली फजिती करण्यासाठी असा डाव टाकला आहे, हे लगेच चतुरकाने ओळखले. तो म्हणाला, "महाराज, स्पष्ट बोलतो क्षमा असावी. बैल दूध कसा देणार?"

"ते मला माहीत नाही." राजाच्या आवाजात राग डोकावत होता. "मला औषधाबरोबर घेण्यास बैलाचे दूध पाहिजे म्हणजे पाहिजे समजले?"

आता, यावर काही बोलणे म्हणजे राजाचा वाढता संताप स्वतःवर ओढवून घेणे, हे चतुरकाने जाणले. त्याने लवून राजाला नमस्कार केला आणि तो राजवाड्याबाहेर पडला.

घरी जाऊन जेवणखाण झाल्यावर चतुरक आता बैलाचे दूध मिळवायचे कसे, या प्रश्नाचे उत्तर शोधू लागला. त्याची चिंताक्रांत मुद्रा त्याची मुलगी शारदा हिच्या नजरेस पडली. तिने विचारले, "बाबा, काय झाले? तुम्ही बरेच काळजीत पडलेले दिसता!"

प्रथम चतुरक काहीच बोलला नाही. पण काळजीचे कारण काय, ते सांगण्याचा शारदेने त्याला खूप आग्रह केला. तेव्हा चतुरक म्हणाला, "राजाने मला बैलाचे दूध आणायची आज्ञा केली आहे. तिचे पालन मी केले नाही तर रागाच्या भरात राजा मला भयंकर शिक्षा देईल. पण शारदे, राजाला जे हवे, ते मोठे विलक्षण आणि अशक्य कोटीतलेच आहे. नाही का?"

"होय तसे आहे खरे !" शारदा म्हणाली, "पण बाबा, राजाला जे हवं आहे ते त्याला मिळवून देण्याची व्यवस्था मी करते. तुम्ही त्याची मुळीच काळजी करू नका!" शारदेचे असे आश्वासक शब्द ऐकून चतुरकाला हायसे वाटले.

संध्याकाळ सरू लागली. तसा दिशादिशांतून निःशब्दपणे चहूकडे उतरणारा अंधार गडद होऊ लागला. रात्र वाढत चालली. अशावेळी शारदेने काही अस्वच्छ कपडे गोळा केले. आणि ते धुण्यासाठी तिने यमुना नदीचा काठ गाठला...

तिथे कपडे धुण्यासाठी राजाच्या शयनगृहाच्या खिडकीखाली असलेली जागा शारदेने पसंत केली. मध्यरात्री सर्वत्र निजानीज झाल्यावर शारदेने कपडे धुण्याचे काम सुरू केले. प्रथम तिने कपडे नदीच्या पाण्यात बुचकळून घेतले. नंतर ते एका लाकडी दंडुक्याने ती बडवू लागली. त्या बडवण्याचा धपधप् असा आवाज रात्रीच्या नीरव शांततेत घुमू लागला...

त्या आवाजाने राजाला झोपेतून जागे केले. त्यामुळे रागावलेल्या राजाने एका रक्षकास बोलावून तो आवाज कशाचा आहे, ते पाहण्याची आज्ञा केली.

त्याप्रमाणे राजवाड्याबाहेर पडलेल्या रक्षकाला नदीकाठी कपडे धूत असलेली एक मुलगी दिसली. लगबगीने तिच्यापाशी जाऊन रक्षकाने दरडावणीच्या स्वरात तिला विचारले, "हे काय चाललंय तुझे इथे ?"

"दिसत नाही का तुम्हाला?" शारदा म्हणाली, "मी कपडे धुतेय."

"ही वेळ आहे का कपडे धुण्याची? कोण आहेस तू?"

"मी आहे मुलगी!"

"कुणाची मुलगी?"

“माझ्या वडिलांची.” शारदा मिस्किलपणे म्हणाली.

“कोण आहेत तुझे वडील?”

“माझ्या आईचे पती!”

अशी शारदेची उत्तरे ऐकून चिडलेला रक्षक म्हणाला,

“ए पोरी, फारच शहाणी दिसतेस तू! चल माझ्यावरोबर महाराजांकडे. ते तुझी सर्व चौकशी करतील.”

रक्षकाने शारदेला राजापुढे नेऊन उभे केले. आपण विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे तिने कशी उध्दटपणाने दिली, तेही त्याने राजाला सांगतले. तेव्हा रागावलेल्या राजाने शारदेकडे वळून मोठ्याने विचारले, “कोण आहेस तू? माझ्या शयनगृहाच्या खिडकीखाली भर रात्री धुणे का धूत होतीस तू?”

शारदेने भयभीत झाल्याप्रमाणे मुद्रा करीत म्हटले, “महाराज, मला रात्रीच्या वेळीच कपडे धुणे भाग पडले. दुपारीच माझ्या बाबांनी एका मुलाला जन्म दिला. संध्याकाळी कपडे धुणे शक्य झाले नाही. म्हणून ते काम करण्यासाठी रात्री यावे लागले. महाराज, क्षमा असावी-”

“पोरी, काय मुर्खासारखे बडबडतेस तू!” राजा चढत्या आवाजात म्हणाला, “मला बनवायला बघतेस काय” पुरूषाला मूल झाले, असे कधी कुणी ऐकलेय् का?”

“तसेच महाराज,” शारदा म्हणाली, “बैल दूध देतो, असे कधी कुणी ऐकलेय् कां?”

शारदेला काय सुचवायचे आहे, ते राजाने बरोबर ओळखले. तो हसला. आणि त्याने शारदेला विचारले, “तू चतूरकाची मुलगी तर नाहीस ना?”

"होय महाराज, मी त्यांचीच मुलगी, शारदा!"

शारदेचे चातुर्य आणि धैर्य पाहून राजा फार खूष झाला. तो म्हणाला, "शारदे, आता तू घरी जा आणि बाबांना सांग की, शशांक राजाला बैलाचे दूध मिळाले आहे. अन् ते आता चतुरकाला झालेल्या नवजात मुलाला द्यायचे आहे."

"पण महाराज, माझ्या बोलण्यावर बाबांचा विश्वास बसला नाही तर?" शारदा धीटपणे म्हणाली.

"बरे, तसे मी तुला लेखी देतो. मग तर झाले?" असे म्हणून राजाने चतुरकाला उद्देशून खालील मजकूर एका कागदाच्या कपट्यावर लिहिला.

"तुम्ही मुलीबरोबर पाठविलेले बैलाचे दूध मिळाले. ते तुम्हाला झालेल्या बाळासाठी म्हणून परत पाठवीत आहे."

त्या मजकुराखाली राजाने सही केली, आणि तो कागदाचा कपटा शारदेच्या हाती दिला. राजाला वंदन करून शारदा घराकडे परतली.

घरी येताच शारदेने घडलेली सर्व हकीकत जेव्हा चतुरकाला सांगून, त्याला राजाच्या सहीचा कागद कपटा दाखविला, तेव्हा मोठ्याने हसून त्याने शारदेला शाबसकी दिली.

या प्रसंगाने चतुरकाला शारदेच्या चातुर्याचा प्रथमच साक्षात्कार झाला.

◇ ◇ ◇ ◇

# योग्य निर्णय



# २. योग्य निर्णय

सिध्दपूरला पहिल्या श्रावण सोमवारी नीलकंठेश्वराची जत्रा भरते. ती पाहण्यासाठी-शिवा आणि भिवा हे दोघे मित्र भल्या सकाळीच रामपूरच्या वेशीतून बाहेर पडले.

सूर्य डोक्यावर आला तेव्हा त्यांची निम्म्याहून अधिक वाटचाल झाली होती. आता चटणी-भाकर खाऊन सिध्दपूर गाठावे असा त्यांनी विचार केला. त्याप्रमाणे जवळच पाणी असलेल्या ठिकाणी एका डेरेदार झाडाखाली बैठक मारून शिवा आणि भिवा यांनी आपल्या जेवणाच्या पुरचुंड्या सोडल्या. शिवाच्या पुरचुंडीत पाच तर भिवाच्या पुरचुंडीत तीन चपात्या होत्या.

ते आता जेवायला सुरूवात करणार तोच, घोड्यावर स्वार झालेला एक धनवंत तिथे आला. त्याने शिवा आणि भिवाला नमस्कार केला. तेव्हा त्यांनीही उलट नमस्कार करून त्याला म्हटले,

"या पाव्हणं या, आमच्याबरोबर तुम्हीही चटणी-चपाती खा."

"ठीक आहे," धनवंत म्हणाला, "पण चटणी दशमी तुम्ही तुमच्यापुरतीच आणलेली असणार! तशात मी तुमच्या पंगतीला बसलो तर माझ्यामुळं तुम्हाला अर्धपोटी राहावं लागेल."

"तसं तुम्ही मनातच आणू नका." शिवा म्हणाला, "ईश्वरकृपेने इथं जे आहे ते आपणा तिघांनाही पुरेसं आहे होय ना रे भिवा?"

"होय. अगदी पुरेसं आहे." भिवा म्हणाला, "या पाव्हणं या."

असा त्यांचा आग्रह पाहून धनवंत त्यांचेजवळ येऊन बसला नंतर चटणीचपात्यांचे तीन सारखे वाटे करून त्यांनी झकास जेवण केले.

जेवण झाल्यावर धनवंत पुढील प्रवासासाठी सिध्द झाला. शिवा आणि भिवाचा निरोप घेऊन घोड्यावर स्वार होण्यापूर्वी त्याने आपल्याजवळच्या थैलीतून आठ रजतमुद्रा काढल्या आणि त्या भिवा आणि शिवा यांच्यापुढे ठेवून तो म्हणाला,

"तुम्ही मोठ्या अगत्यानं मला आपल्या पंगतीचा लाभ दिला त्याबद्दल कृपा करून माझी ही भेट घ्या!"

पण प्रथम भिवा आणि शिवा यांनी नकार दिला. ते धनवंताला म्हणाले, "खरं म्हणजे तुम्हीच आमच्याबरोबर दोन घास खाऊन आमचा मान केला. कशाला देता आम्हाला रजतमुद्रा!" यापुढेही ते काही बोलणार तोच धनवंत घोड्यावर स्वार झाला. आणि तेथून दौडत निघून गेला.

आता शिवा आणि भिवा यांना आठ रजतमुद्रा दोघात वाटून घेण्याचे काम करायचे होते. शिवा भिवाला म्हणाला, "आपणा दोघात आठ रजतमुद्रा वाटून घेण्याचं काम तर फार सोपं आहे. माझ्यापाशी चपात्या होत्या म्हणून मी पाच रजतमुद्रा घेतो. तुझ्यापाशी तीन चपात्या होत्या म्हणून उरलेल्या तीन तू घे!"

"हे नाही गड्या बरोबर," शिवा म्हणाला, "आठ रजतमुद्रांची बरोबर वाटणी झाली पाहिजे. चार तू घे, चार मी घेतो."

असे भिवाचे बोलणे शिवाला मान्य झाले नाही. मग त्यांच्यात भांडण सुरू झाले. थोडावेळ भांडाभांडी झाल्यावर भिवा म्हणाला,

"असं भांडत बसून आपला प्रश्न सुटणार नाही. तो सोडविण्यासाठी आपल्याला कुणा तिसऱ्या शहाण्या माणसाची मदत घेतली पाहिजे!"

"कुणाकडं आपण जायचं!" शिवाने विचारले.

तेव्हा भिवा म्हणाला, "इथून जवळच असलेल्या झाडीत एक विद्वान स्वामी राहतात. आपण त्यांच्याकडे जाऊ आणि आपल्या वाटणीचा

प्रश्न त्यांच्यापुढं ठेवू चल!"

त्याप्रमाणे शिवा भिवासह त्या स्वामींकडे गेला. आणि त्याने वाटणीचे गाऱ्हाणे त्यांना सांगितले. ते ऐकून स्वामींनी भिवाला विचारले,

"हा तुझा मित्र शिवा, तुला तीन रजतमुद्रा देत होता त्या तू का घेतल्या नाहीस?"

"कारण शिवानं केलेली वाटणी मला बरोबर वाटली नाही. त्या श्रीमंत पाहुण्याने दिलेल्या रजतमुद्रांपैकी निम्म्या मला मिळाल्या पाहिजेत. तुम्ही योग्य असेल तो न्याय द्या!"

"ठीक आहे" स्वामी म्हणाले, "मी योग्य आणि बरोबर न्याय देतो. पण तो योग्य न्याय तुला अन्यायाचा वाटेल."

असे म्हणून स्वामींनी सात रजतमुद्रा शिवाला दिल्या. आणि उरलेली एक रजतमुद्रा भिवाच्या हातावर ठेवली.

तेव्हा भिवाला फार वाईट वाटले. तो स्वामींना म्हणाला, "हा कसला न्याय? शिवान मला देऊ केलेल्या तीन रजतमुद्रासुध्दा घेण्यास मी तयार नव्हतो. आता तर तुम्ही फक्त एकच रजतमुद्रा माझ्या हातावर ठेवली? हा न्याय नाही अन्याय आहे!"

"नाही. अन्याय मुळीच नाही." स्वामी शांतपणे म्हणाले, "मी तुला सगळं स्पष्टपणे समजावून सांगतो. म्हणजे आपल्यावर अन्याय झाला नाही, असं तुझं तुलाच वाटेल."

एवढे बोलून स्वामी काही क्षण थांबले. नंतर ते भिवाला म्हणाले, "आता मला सांग, तुमच्यापाशी एकंदर किती चपात्या होत्या?"

"आठ" भिवा म्हणाला.

"आणि त्या चपात्या खाणारी माणसं किती होती?"

"तीन. मी, शिवा आणि श्रीमंत पाव्हणा."

"तुम्हा सर्वांचे वाटे सारखे होते?"

"होय. अगदी सारखे होते."

"आता मला सांग भिवा," स्वामी म्हणाले, "प्रत्येक चपातीचे आपण तीन भाग केले तर एकूण किती भाग होतील?"

"चोवीस भाग होतील."

"अगदी बरोबर. प्रत्येकाच्या वाट्याला किती भाग आले?"

"प्रत्येकाच्या भागाला आठ भाग आले."

"ठीक आहे" स्वामी म्हणाले, "भिवा, तुझ्या तीन चपात्यांचे किती भाग झाले?"

"नऊ भाग झाले." भिवा म्हणाला.

"त्या नऊ भागांपैकी तू आणि पाहुण्यानं किती भाग खाल्ले?"

"मी आठ भाग खाल्ले. आणि पाहुण्यानं फक्त एक भाग खाल्ला."

"आता मला सांग, पाहुण्यानं शिवाच्या चपात्यांचे किती भाग खाल्ले?"

"सात भाग खाल्ले."

"ठीक आहे. आता तूच सांग भिवा, तुम्हा दोघांपैकी प्रत्येकाला किती रजतमुद्रा मिळाल्या पाहिजेत?"

"शिवाला सात रजतमुद्रा मिळाल्या पाहिजेत. आणि मला फक्त एक!" असे म्हणून भिवा काही क्षण थांबून पुढे म्हणाला,

"स्वामी, सुरूवातीला तुम्ही जो निर्णय दिला तो अगदी बरोबर होता, हे आता मला समजलं."

ते ऐकून स्वामी किंचित हसून म्हणाले,

"भिवा, तुझ्या हातावर फक्त एक रजतमुद्रा ठेवून मी तुला योग्य तोच न्याय दिला आहे. तुझ्यावर अन्याय केला नाही, अशी आता तुझी खात्री झाली ना?"

"होय स्वामी. आपण आमच्या वादाचा केलेला निर्णय अगदी बरोबर आहे."

नंतर शिवा आणि भिवा यांनी स्वामींना वंदन केले. आणि पुन्हा त्यांची पुढे वाटचाल सुरू झाली.

◇◇◇◇

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. २६८४ दिनांक 9/7/03
विषय कथा-वा क्र.........

# न संपणारी गोष्ट



# ३. न संपणारी गोष्ट

राजा सोमदेवाला गोष्टी ऐकण्याचे विलक्षण वेड होते. गोष्टी वाचण्यापेक्षा गोष्टी ऐकणे त्याला फार आवडे. भुताखेतांच्या, पशुपक्षांच्या, राक्षसांच्या, वनदेवतांच्या, माणसांच्या, सर्व प्रकारच्या चांगल्या वाईट गोष्टी सोमदेवाने ऐकल्या होत्या. पण त्याचे समाधान झाले नव्हते. उलट गोष्टी ऐकण्याचे त्याचे वेड अधिकच वाढले.

सोमदेवाच्या राज्यात सुबत्ता होती. प्रधान व मंत्री सज्जन व राजनिष्ठ म्हणून ठीक होते. त्यांनी सोमदेवाचे लक्ष राज्यकारभारात गुंतविण्याचा खूप प्रयत्न केला. पण व्यर्थ! सोमदेवाचा गोष्टी ऐकण्याचा नाद कधी सुटला नाही.

गोष्ट सांगणाऱ्याने एक गोष्ट संपविली की, राजा म्हणे, 'दुसरी गोष्ट सांग.' दुसरी गोष्ट संपली की, राजा म्हणे, 'आता तिसरी गोष्ट सांग.' तिसरी गोष्ट संपली की, राजा आश्चर्याने म्हणायचा, 'आँ, एवढी लहान गोष्ट! फारच लवकर संपली. आता चौथ्या गोष्टीची सुरुवात कर.' गोष्ट सांगणारा बिचारा कंटाळून जात असे. आणि सोमदेवालाही ते बरे वाटत नसे.

शेवटी राजा सोमदेवाने राज्यात दवंडी द्यावयास लावून असे जाहीर केले की, जो कोणी न संपणारी गोष्ट सांगेल त्याच्या गळ्यात राजकन्या माळ घालील. आणि आंधण म्हणून त्याला माझे अर्धे राज्यही मिळेल. पण गोष्ट जर संपली तर गोष्ट सांगणाऱ्याला जन्मभर बंदिखान्यात राहावे लागेल.

अशा प्रकारची दवंडी ऐकल्याबरोबर राजवाड्याकडे तरूणांची रीघ

लागली. त्या तरूणात राजपुत्र, सरदारपुत्र, यांच्यावरोवर गोष्टी सांगण्याचा धंदा करणारे ही पुष्कळ तरूण होते.

पण राज्य आणि राजकन्या यांच्या अभिलाषेने आलेल्या त्या तरूणांच्या गोष्टी संपल्या. आणि त्या बिचाऱ्यांच्या नशिवी बंदिखाना आला. तिथेच त्यांना जन्मभर आपल्या अविचारावद्दल पश्चाताप करीत बसून राहण्याची पाळी आली.

सोमदेव राजाला न संपणारी गोष्ट सांगण्यात कोणीही तरूण यशस्वी होत नव्हता. आणि तिकडे बंदिखान्यात मात्र तरूणांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली होती. काही तरूणांच्या गोष्टी आठवडाभर टिकल्या. काहींच्या गोष्टी महिनाभर चालल्या. आणि काहींनी आपल्या गोष्टी ताणलेल्या रबराप्रमाणे खूप ताणल्या. पण अखेर सहा महिन्यांनी त्यांच्या गोष्टीची अखेर झाली. आणि अखेरीस त्यांची जड पावले बंदिखान्याच्या मार्गावर पडली.

असेच बरेच दिवस गेले. आणि एके दिवशी देवव्रत नावाचा एक रूबाबदार, देखणा तरूण राजवाड्याच्या प्रवेशद्वाराशी आला. आणि त्यानं राजाच्या भेटीची परवानगी मागितली. देवव्रताला सोमदेव राजाकडे नेण्यात आले. राजाला नम्रपणे नमस्कार करून देवव्रत म्हणाला, “महाराज, मी आपणास न संपणारी गोष्ट सांगतो. आपली आज्ञा व्हावी!”

देवव्रताला पाहिल्यावरोबर राजाला त्याच्याविषयी आपुलकी वाटू लागली होती. एवढा देखणा तरूण बंदिखान्यात पिचत राहावा ही कल्पना त्याला सहन झाली नाही. तो म्हणाला, ‘हे तरूणा, न संपणारी गोष्ट सांगणारास गोड बक्षीस मिळणार आहे हे खरं, पण गोष्ट संपली तर त्याला भयंकर शिक्षा भोगावी लागणार आहे. हे तुला माहीत आहे ना?”

“होय महाराज,” देवव्रत म्हणाला. ‘तशी माझी तयारी आहे!’

"ठीक आहे" सोमदेव म्हणाला, "माझीही गोष्ट ऐकण्याची तयारी आहे. कर सुरूवात."

राजाज्ञेने मिळालेल्या आसनावर बसून देवव्रताने शांतपणाने गोष्ट सांगण्यास सुरूवात केली.

'महाराज, खूप वर्षापूर्वी कैकय देशात किरात नावाचा एक राजा राज्य करीत होता. तो फार लहरी आणि जुलुमी होता.

एकदा त्याच्या डोक्यात असा विचार आला की, आपल्या राज्यात मुबलक पिकणारा सर्व गहू आपण ताब्यात घ्यावा, म्हणजे आपण खूप श्रीमंत होऊ. त्याप्रमाणे त्यानं आपल्या अधिकाऱ्यांना आज्ञा केली गव्हाच्या पोत्यांनी भरगच्च झालेल्या गाड्यामागून गाड्या राजधानीकडे दौड करू लागल्या. आता एवढा गहू ठेवायचा कुठं?

किरात राजानं ताबडतोब एक प्रचंड धान्य कोठार बांधण्याचा हुकूम सोडला. राज्यातले एकूण एक गवंडी त्या कामाला लागले. कोठार आकार घेऊ लागलं, वाढू लागलं, वाढत वाढत ते जेव्हा एका प्रचंड डोंगराएवढं झालं, तेव्हा बांधकाम पूर्ण झालं.

त्या प्रचंड कोठाराला दरवाजे ठेवले होते. त्यातून गव्हाची पोती आणून ती कोठारात रिकामी केली गेली. फक्त एकच वर्ष असं घडलं असं नव्हे, तर पुढं कित्येक वर्ष किरातानं हा उपक्रम चालू ठेवला होता.

ते प्रचंड कोठार जेव्हा गव्हानं पूर्णपणे भरलं तेव्हा किरात राजानं कोठाराचे दरवाजे विटांच्या बांधकामानं बंद करून टाकण्याचा हुकूम सोडला. आणि कोठारातला संपूर्ण गहू बंदिस्त झाला. पण-'

'पण काय!' सोमदेव उत्सुकतेने म्हणाला, 'ऐका महाराज,' देवव्रत संथपणे म्हणाला. 'पण गवंड्याच्या नजरचुकीमुळं कोठाराच्या अगदी वरच्या बाजूस असलेली एक अगदी लहान फट बुजवायची राहून गेली.'

'अस्सं! मग पुढे काय झालं?' सोमदेवाने विचारले.

'पुढे काही महिन्यांनी कैकय राज्यावर टोळांनी हल्ला केला.' देवव्रत पुढे सांगू लागला. 'एक प्रचंड टोळधाड होती ती! अबबब, केवढी प्रचंड टोळी होती ती! एक मैल लांब आणि पाव मैल रूंद अशी ती भयंकर टोळधाड किंगत राजाच्या प्रचंड धान्यकोठारच्या रोखानं जलद उडत चालली होती. कोठारापाशी आल्यावर सगळे टोळ पटापट कोठारावर उतरले.

कोठाराच्या वरच्या बाजूस असलेली एक छोटी फट एका बिलंदर टोळाच्या तीक्ष्ण नजरेनं टिपली. तो हळूच त्या फटीतून कोठारात शिरला. आणि गव्हाचा एक दाणा घेऊन बाहेर पडला.

ते पाहून दुसरा टोळ त्याच वाटेनं कोठारात शिरला आणि गव्हाचा एक दाणा घेऊन बाहेर पडला.

नंतर तिसरा टोळ कोठारात शिरला आणि गव्हाचा एक दाणा घेऊन बाहेर पडला.

नंतर चौथा टोळ कोठारात शिरला आणि गव्हाचा एक दाणा घेऊन बाहेर पडला.

नंतर पाचवा टोळ कोठारात शिरला आणि गव्हाचा एक दाणा घेऊन बाहेर पडला.

नंतर सहावा टोळ कोठारात शिरला आणि गव्हाचा एक दाणा घेऊन बाहेर पडला.

अशाच प्रकारे आणखी एक टोळ व आणखी एक दाणा असे सोमदेवाला सांगत त्या चतुर देवव्रताने एक महिना घालविला.

सोमदेव दमदार स्वभावाचा होता. तरीसुद्धा 'एक टोळ आणि एक

गव्हाचा दाणा' याचे तेच पुराण ऐकून त्याला कंटाळा आला. तो देवव्रताला म्हणाला, 'टोळ आणि गव्हाचा एक दाणा यांच्यासंबंधी तुझं सांगणं आता बस्स झालं. त्या टोळांनी त्यांना जेवढे गव्हाचे दाणे हवे होते ते घेतले असं आपण समजू. नंतर काय झालं ते आता सांग!'

'क्षमा असावी, महाराज, 'देवव्रत नम्रपणे म्हणाला.

'आधी काय काय झालं ते सांगितल्याशिवाय नंतर काय झालं ते कसं सांगता येईल?'

'ठीक आहे!' असं म्हणून सोमदेव गप्प बसला. पुढे सहा महिने देवव्रताने एक टोळ आणि एक गव्हाचा दाणा यांचे तेच ते पुराण राजाला ऐकविले.

तेव्हा गोष्ट सांगणाऱ्या देवव्रताला मधेच थांबवून सोमदेव म्हणाला, 'भल्या माणसा, तुझ्या त्या टोळांचा मला आता अगदी वीट आला आहे. त्या कोठारातले सगळे गहू टोळांनी केव्हा संपविले असं तुला वाटतं?'

'ते मी आताच कसं सांगू महाराज!' देवव्रत म्हणाला, त्या टोळांनी आतापर्यंत त्या प्रचंड कोठारातील गव्हांचा फक्त पाव इंच जाडीचा थर संपविला, इथपर्यंत माझी गोष्ट आली आहे. अजून असंख्य टोळ कोठारावर बसलेले आहेत. महाराजांनी धीर धरावा. योग्य वेळी त्या टोळाचं काम संपेल.'

सोमदेवाने वर्षभर धीर धरला. देवव्रताचे एक टोळ आणि एक गव्हाचा दाणा' हे पुराण चाललेच होते. तेच ते ऐकून जेव्हा बिचाऱ्या सोमदेवाच्या सहनशक्तीची परमावधी झाली, तेव्हा तो मोठ्यांदा म्हणाला, 'भल्या माणासा, बंद कर तुझं टोळ पुराण! तुझं राजकन्येशी लग्न होईल. माझं अर्ध राज्यच काय पण तू मागशील ते तुला मिळेल. कृपाकरून त्या लोचट टोळांविषयी आता एकही शब्द तू बोलू नकोस!'

पुढे काही महिन्यांनी देवव्रताचा राजकन्येशी मोठ्या थाटामाटात विवाह झाला. चतुर व देखणा जावई मिळला म्हणून राजा सोमदेव खूष झाला. गोष्टीचा शेवट काय झाला ते मात्र त्याने देवव्रताला कधीही विचारले नाही. देवव्रताने केलेल्या विनंतीला मान देऊन राजा सोमदेवाने बंदिखान्यातल्या सर्व तरूणांची मुक्तता केली.

आणि महत्वाची गोष्ट अशी की, देवव्रतासारखा खमंग मांत्रिक भेटल्यामुळे राजा सोमदेवाचे रात्रंदिवस गोष्टी ऐकण्याचे वेड पार नाहीसे झाले.

◊◊◊◊

# ४. अगडबंब तगडबंब

साता समुद्रापलीकडे एका दाट अरण्यात अगडबंब, तगडबंब आणि रगडबंब या नावाचे तीन राक्षस राहत होते.

फक्त उन्हाळ्यातच हे तीन राक्षस आपल्या काळ्या किल्ल्याच्या बाहेर पडत असत. त्यावेळी हे तिघेही तीन दिशांना जात.

वाटेत जी नगरे लागत त्या नगरातील लोकांना ते लुटत असत आणि अन्नधान्य व कपडे यांची मोठमोठी गाठोडी घेऊन परत किल्ल्याकडे जात.

अन्नधान्य व कपडे यांचा साठा आणि तोही फक्त उन्हाळ्यातच करण्याचे कारण त्या प्रदेशात एवढा पाऊस पडत असे की, पावसाळ्यात कोणीही घराबाहेर पडत नसे. जिकडे तिकडे पाण्याचे लोटच्या लोट वाहत असत. हिवाळ्यात खूप हिम पडावयाचे. हिमाची वादळे व्हावयाची. मग कडाक्याच्या अंग गोठून टाकणाऱ्या थंडीत कोण घराबाहेर पडणार? उन्हाळ्यात किल्ल्यातील कोठड्या अन्नधान्य व कपडे यांनी भरून टाकल्या की आठ महिने राक्षसांना काम नसे.

एके दिवशी अगडबंब व रगडबंब तगडबंबला म्हणाले, ‘जेवण फार झाले आहे, चल चार मैल फिरून येऊ या.’

तगडबंब म्हणाला, ‘मी सकाळीच वीस मैल जाऊन आलो आहे. फार दमल्यामुळे आणि तशात जेवण फार झाल्यामुळे मला झोप येते आहे. तुम्ही दोघेच जा!

अगडबंब म्हणाला, ‘तू फार आळशी आहेस. चल, लवकर परत येऊ.’

तगडबंब काहीच बोलला नाही. तेव्हा त्याच्या मनात खरोखरच फिरावयास यावयाचे नाही हे अगडबंब व रगडबंब यांनी ओळखले. दोघेच फिरावयास निघून गेले. डोळे मिटू लागल्यामुळे तगडबंब तेथेच जमिनीवर पडला. थोड्याच वेळात त्याला गाढ झोप लागली.

काही वेळानंतर एक लहान मुलगा आपल्या पायाजवळ उभा आहे असे तगडबंबला दिसले. मेघगर्जनेसारखी आरोळी मारण्याचा प्रयत्न करीत तो ताडकन् उठून उभा राहिला, पण त्याच्या तोंडातून काहीच आवाज फुटला नाही. आपल्या हातातील काठीचा एक तडाखा तगडबंबाच्या पायावर मारून तो लहान मुलगा म्हणाला, 'ए आळशी राक्षसा ऊठ, मी सांगतो ते काम मुकाट्याने कर.'

एका चिमुरड्या पोराने आपल्याला आज्ञा करावी याचा तगडबंबला फार राग आला. पण काहीच न बोलता तो निमूटपणे त्या लहान मुलाच्या मागोमाग किल्ल्याबाहेर आला. त्या लहान मुलाने तगडबंबला अरण्यातील मोठी झाडे तोडावयास सांगितले. मोठे हंडे भरून पाणी आणण्यास सांगितले. तगडबंबाने एक काम संपविले की, तो लहान मुलगा तगडबंबाला दुसरे काम सांगे. तशी कामे करता करता तगडबंब थकून गेला.

शेवटी तो लहान मुलगा म्हणाला, 'आता आणखी एकच काम कर. दहा मैलावरील शहरात जा आणि मला एक चांगली बुटांची जोडी आणून दे. !'

तगडबंब मुकाट्याने उठला आणि थोड्याच वेळात बुटांची जोडी घेऊन परत आला. ती बुटांची जोडी पाहून त्या लहान मुलाने आपल्या हातातील काठीचा आणखी एक तडाखा तगडबंबाच्या पायावर मारला आणि तो म्हणाला, 'मूर्ख राक्षसा, एवढी मोठी बुटांची जोडी कां आणलीस? हे बूट माझ्या पायांना येणार नाहीत. पाहिलेस माझे पाय किती लहान आहेत

ते!

एवढे बोलून त्या लहान मुलाने आपल्या हातातील काठीने तगडबंबच्या पायावर सपासप तडाखे मारण्यास सुरूवात केली. तगडबंबाने जोराने ओरडत एक उंच उडी घेतली आणि समोर पाहिले.

अगडबंब आणि रगड़बंब, त्याला झोपेतून उठविण्यासाठी चापट्या मारीत होते. तगडबंब उठून बसला. त्याने इकडे तिकडे पाहिले. त्याला छळणारा लहान मुलगा कोठेच दिसत नव्हता. तो स्वतःशी उद्गारला, 'ते स्वप्नच होते तर!'

त्याने ते स्वप्न अगडबंब व रंगडबंब यांना सांगितले. ते ऐकून ते दोघे मेघगर्जनेसारखा आवाज करीत एवढ्या मोठ्याने हसू लागले की, त्यांचा काळा किल्लासुद्धा थरथर कापू लागला. आणि तगडबंब? तो एका दगडी खांबाकडे एकटक पाहात होता. त्या दगडी खांबाजवळ एक मोठी बुटांची जोडी पडलेली होती.

◇◇◇◇



# ५. हरिदत्त

शिशिर ऋतु संपत आला. दुरून वसंताची ललकारी ऐकू आली. झाडांना व वेलींना नवी पालवी फुटू लागली. आंब्याच्या झाडावरून कोकिळांचे 'कुहू कुहू' कूजन ऐकू येऊ लागले. वाऱ्याच्या मंद झुळुकीवर तरंगणारा फुलांचा सुगंध चोहीकडे दरवळू लागला.

पहाट झाली. कोंबडे आपल्या माना उंचावून आरवू लागले. इतका वेळ निद्रिस्त असलेले सोनगांव जागे होऊ लागले. नेहमीप्रमाणे हरिदत्ताला लवकर जाग आली. थोड्याच वेळात खांद्यावर एक फाटकी कांबळ, हातात वेळूची काठी आणि अनवाणी असा हरिदत्त गायींच्या गोठ्यातून बाहेर पडला. त्याच्या पाठोपाठ एकामागून एक वीस गायींचा तांडा निघाला. त्या पहाटेच्या शांतवेळी गायींच्या गळ्यातील घुंगुरांचा आणि घंटांचा मंजुळ आवाज ऐकू येऊ लागला.

हरिदत्ताच्या मागून ओळीने त्या गाई चालल्या होत्या. त्यांना हाकून नेण्याची आता जरूरी नव्हती. हरिदत्ताच्या प्रेमळ व दयाळू स्वभावामुळे त्या मुक्या जनावरांना त्याच्याविषयी फार जिव्हाळा वाटत होता. त्याच्या बोलण्याचा किंवा पालवांचा आवाज ऐकू आला की, सर्व गायी आपले कान उभारून मोठ्या आनंदाने हंबरत असत.

आज हरिदत्त मुकाट्याने पुढे चालला होता. नेहमीच्या सवयीप्रमाणे मागे वळून त्याने कोणत्याही गायीला लाडिकपणे हाक मारली नाही. तो कष्टी झाला होता. ज्या शेतकऱ्याजवळ तो रहात होता त्याच्या बायकोने आज त्याला उपाशी पाठविले होते. बरोबर न्याहारी नसल्यामुळे सर्व दिवस त्याला उपास पडणार होता. रानात जी काही फळे सापडतील तेवढी

खाऊन भूक भागविणे त्याला भाग होते.

अशा दुःखद विचारामुळे सूर्योदयाच्या अपूर्व शोभेकडे त्याचे लक्ष नव्हते. जाता जाता नेहमीप्रमाणे पक्ष्यांच्या गोड आवाजात आपला आवाज मिसळून त्याने शीळ घातली नाही. तो वळणे घेत समोरच्या टेकडीकडे निघाला. त्याच्या पाठोपाठ गायींचा कळप जाऊ लागला.

टेकडीच्या खालच्या बाजूस हिरवा गालिचा पसरल्यासारखे दाट हिरवळ उगवलेली होती. सूर्यप्रकाशात त्यावरील दवबिंदू मोत्यांप्रमाणे चमकत होते. तेथे गेल्यावर गायींचा कळप इकडे तिकडे पांगला आणि मोठ्या आनंदाने त्यांनी चरावयास सुरवात केली.

हरिदत्त खाली मान घालून तेथेच हिरवळीवर बसला. जवळच उगवलेल्या रानफुलांकडे त्याचे लक्ष गेले नाही. पक्ष्यांच्या नानाविध आवाजांचीही त्याला गंमत वाटेना. भूक लागल्यावर अपूर्व सृष्टीसौंदर्याची शोभा पाहून कसे आनंदित होता येईल? त्याने पोटभर समाधान का वाटेल? हरिदत्ताला भूक लागली होती. आज खायला काही मिळणार नाही म्हणून तो कष्टी झाला होता. पण त्याला त्याचे कर्तव्य करायलाच पाहिजे होते.

तो उठून बसला आणि सभोवती पाहत त्याने आपल्या कळपातील गायी मोजल्या. नाहीतर चुकून एखादी मागे राहायची किंवा कळपापासून दूर दूर चरत जायची. आतापर्यंत गायींकडे आपले कसे लक्ष गेले नाही, याचे त्याला आश्चर्य वाटले. इकडे तिकडे पाहता पाहता जवळ गवताच्या आडून अर्धवट डोकावणारा एक सप्तरंगी रूमाल त्याच्या दृष्टीस पडला. सूर्य प्रकाशात त्याचे सात रंग मोठ्या दिमाखाने झगमगत होते.

हरिदत्ताने धावत जाऊन तो रूमाल उचलून घेतला आणि आपल्या गळ्याभोवती लपेटून टाकला. तो काय आश्चर्य! त्याची तहानभूक नाहीशी झाली. तो आनंदाने नाचू लागला, गाऊ लागला. ते गोड संगीत निळे निळे आकाश भरून टाकू लागले. तो हसू लागला. त्याचे हृदय आनंदाने भरून

आले. त्याला वाटले, "हे जग किती किती सुंदर आहे!"

सूर्य मावळतीकडे निघाला. तेव्हा एक लहान मुलगा धावत हरिदत्ताजवळ आला. तो एकसारखा रडत होता, आणि रडून त्याचे निळसर डोळे लाल झाले होते.

"अरे बाळ, तुला रडायला काय झाले? बघ. इकडे तिकडे कशी गंमत आहे. चल, ये आपण खेळू" हरिदत्त म्हणाला आणि हसत हसत त्याने मोठ्या आनंदाने टाळ्या वाजविल्या. परंतु त्या लहान मुलाने मान हलवून नको असे सांगितले. तो म्हणाला, "तुला इथं माझा रूमाल सापडला काय? त्याच्यावर सात रंग -"एकदम त्याची दृष्टी हरिदत्ताच्या गळ्याभोवती लपेटलेल्या रूमालाकडे गेली आणि तो चाचरतच पुढे म्हणाला, "तो रूमाल तुझाच कां?" एक क्षणभर हरिदत्त स्तब्ध उभा राहिला. सांगावे का या मुलाला हा रूमाल माझा आहे म्हणून. जाईल पुढे तसाच तपास करीत मुकाट्याने. त्याच्या मनात असा एक विचार चमकून गेला. पण फारच थोडा वेळ तसला स्वार्थी विचार त्याच्या डोक्यात राहिला. दुसऱ्याच क्षणी तो उद्‌गारला,

'नाही! हा रूमाल मला इथं सापडला. तुझा आहे का हा?' हरिदत्ताने गळ्यातील रूमाल काढून त्या लहान मुलाच्या हातात देत विचारले.

"या रूमालासाठीच इतका वेळ तू रडत होतास वाटतं?" पण तो सप्तरंगी रूमाल त्या लहान मुलाच्या हातात पडल्याबरोबर त्याचे रडणारे डोळे हसू लागले. इतका वेळ डोळे पुसणारे हात आनंदाने टाळ्या वाजवू लागले. त्याने स्वतःभोवती एक गिरकी घेतली. आणि सप्तरंगी रूमाल हाताने फडकवित तो हरिदत्ताच्या दृष्टीआड झाला.

दोन क्षणापूर्वीच हरिदत्त त्या लहान मुलासारखा नाचत, गात, हसत होता. पण आता तो बिचारा जर मोठा नसता तर त्या लहान मुलासारखाच रडू लागला असता. कारण तो आता पुन्हा दुःखी झाला. भुकेने त्याचा जीव

कासावीस होऊ लागला. मोठ्या कष्टाने, त्याने सर्व गाई गोळा केल्या, आणि तो घराकडे परत निघाला. घरी आल्यावरसुद्धा त्याला समाधान मिळाले नाही. रागीट बोलणी, एक भाकरीचा तुकडा आणि त्यावर थोडी चटणी. अर्धपोटी हरिदत्त तसाच झोपी गेला.

झोपेत त्याला एक स्वप्न पडले. आपल्या गळ्यात झगमगणारा सप्तरंगी रूमाल आहे, आणि टेकडीच्या पायथ्याशी हिरवळीवर आपण इकडे तिकडे खेळत आहोत. मग तो एवढ्या जोरात हसू लागला की, शेजारी गोठ्यात बांधलेल्या गाई आपल्या माना वळवून आश्चर्याने त्याच्याकडे पाहू लागल्या. त्यांना वाटले, सकाळ तर झाली नाही ना? स्वप्नाने हरिदत्ताला आनंदित केले पण तो जागा झाल्यावर स्वप्नातला आनंद पार नाहीसा झाला.

दुसऱ्या दिवशी पहाटेच्या थंडीत हरिदत्त उपाशीच गायींचा कळप घेऊन निघाला. टेकडीच्या पायथ्याशी आल्यावर, गाई इकडे तिकडे चरावयास जाऊ लागल्या. दमल्यामुळे हरिदत्त हिरवळीवर आडवा झाला. थोड्या वेळाने तो उठून बसला आणि भीतभीतच चोरट्या नजरेने त्याने इकडे तिकडे पाहिले. त्याला वाटले आजही सप्तरंगी रूमाल दिसेल पण तो तेथे नव्हताच तर तो त्याच्या नजरेस कोठून पडणार? त्याची निराशा झाली.

पण अगदी त्याच जागेवर घुंगरे लावलेली एक निळी टोपी त्याला दिसली. हरिदत्ताने ती उचलून आपल्या डोक्याला घातली. अगदी बरोबर ती बसली. जणू काय, त्याच्यासाठीच ती तयार करून ठेवली होती. सप्तरंगी रूमाल गळ्यात घातल्यावर ज्याप्रमाणे त्याची भूक नाहीशी होऊन तो आनंदी झाला होता. तसेच त्याला ती टोपी घातल्यापासून वाटू लागले. सर्व दिवसभर त्याने गोड गाणी म्हटली, आणि अगदी संध्याकाळ होईपर्यंत तो खेळला. तो स्वतःशी म्हणाला, "काल मी मला आवडलेला

सुंदर रूमाल परत दिला. आज ही निळी टोपी कुणीही मागायला आले तरी मी देणार नाही." त्याने आपली मान हलविली. त्याबरोबर टोपीला गुंफलेल्या घुंगराचा किण्-किण् -किण् असा गोड आवाज वातावरणात भरून राहिला.

तो मधुर आवाज ऐकूनच की काय, एक लहान मुलगी फुलापाखरांप्रमाणे दुडूदुडू धावत हरिदत्ताजवळ आली. तिने निळसर रंगाचा परकर पोलका घातला होता. त्याच्यावर काढलेली सोनेरी तारकांची वेलवुट्टी मावळत्या सूर्यप्रकाशात चमकत होती. वाऱ्याने भुरूभुरू उडणाऱ्या केसात तिने दोन निळी फुले खोविली होती. आपला चिमुकला हात हरिदत्ताच्या डोक्याकडे करून ती म्हणाली,

"दादा,दादा, ती टोपी तुला कुठं रे सापडली? त्या टोपीचा सर्व दिवसभर मी शोध करीत होते. सकाळी इकडून जाताना वाऱ्याने ती या हिरवळीवर पडली असावी..देणार ना मला माझी टोपी?"

बिचारा हरिदत्त! त्याला वाटले की, ती टोपी आपल्याजवळ ठेवावी. त्याने आपली मान हलविली आणि ती मुलगी आश्चर्याने त्याच्याकडे पाहू लागली. तिने आपली मान खाली घातली. दोन टपोरे मोत्यासारखे चमकणारे अश्रू तिच्या डोळ्यातून गालावर ओघळले.

"दादा,दे रे माझी टोपी मला परत. तिच्याशिवाय मी घरी मुळीच जाऊ शकत नाही." तिच्या प्रत्येक शब्दात आर्तता होती. दयाळू आणि प्रेमळ अंतःकरणाच्या हरिदत्ताला ते पाहवले नाही. उगीचच त्या लहान मुलीबरोबर आपण कठोरतेने वागलो असे त्याला वाटले. त्याने चटकन् आपल्या डोक्यावरून टोपी काढली आणि त्या लहान मुलीने पुढे केलेल्या हातात दिली.

तिने मोठ्या आनंदाने ती घेतली. ती हसू लागली. हरिदत्तही हसू लागला. आपला एक हात वर करून ती निघून गेली. तेव्हा सर्व

सूर्यप्रकाशच ती आपल्या बरोबर घेऊन गेली, असे हरिदत्ताला वाटले. सर्व गाई गोळा करून तो जेव्हा घराकडे परत निघाला, तेव्हा त्याला सर्व जग अंधाराने एकदम झाकून गेल्याप्रमाणे अगदी उदास असे दिसू लागले.

तिसरा दिवस उजाडला. त्यादिवशी देखील हरिदत्ताला गाई चरायला उपाशी पाठविले गेले. जाता जाता त्याला वाटले, आजदेखील हिरवळीवर मला काहीतरी सापडेल आणि माझी तहानभूक विसरून मी आनंदी होईन!

एक दिवस सप्तरंगी रूमालाने हरिदत्ताच्या जीवनात आनंद निर्माण केला होता. तेव्हा त्याला वाटले होते, जग कितीतरी सुंदर आहे. दुसऱ्या दिवशी एका निळ्या टोपीने त्याला सुखी केले होते. त्या दोन्ही वस्तू आपल्याजवळ असाव्या असे त्याला वाटले होते. पण शेवटी त्या ज्याच्या त्याला परत करणे भाग पडले.

आज कोणतीही वस्तू सापडली तरी ती परत करायची नाही, असा हरिदत्ताने निश्चय केला.. तो मोठ्या अंधीरतेने वाट चालू लागला. टेकडीच्या पायथ्याशी आल्यावर गाई चरू लागल्या. हरिदत्त हिरवळीवर काही सापडते का म्हणून इकडे तिकडे बारकाईने पाहू लागला.

पण सप्तरंगी रूमाल किंवा निळी टोपी दोन्हीही त्याला दिसले नाहीत. त्या कुरणाचा प्रत्येक कानाकोपरा हरिदत्त शोधू लागला. पण व्यर्थ! मोठ्या निराशेने त्याने आपली पावले मागे वळविली. त्याच क्षणी त्याला आपल्या उजव्या पायाजवळ एक चकचकीत वस्तू दिसली. त्याने ती चटकन् उचलून घेतली.

गाईच्या गळ्यातील एक लहान घंटा होती ती. तिचे मोल किती असणार? पण काही नसल्यापेक्षा बरे, असे हरिदत्तास वाटले. निदान घरी परततांना, गायींना बोलावण्यासाठी तरी त्या घंटेचा उपयोग होईल, असे त्याने आपले समाधान करून घेतले. असल्या क्षुल्लक वस्तूवर कुणीच

आपला हक्क सांगावयास येणार नाही, असे त्याला वाटले.

हरिदत्ताने ती घंटा खिशात ठेवली आणि मोठ्या निर्भयतेने व प्रसन्नतेने तो पुढे चालू लागला. तो फार पुढे गेला नाही. तोच समोरून काठी टेकीत येत -असलेला एक कुरूप म्हातारा त्याने पाहिला. त्याची पांढरी शुभ्र दाढी त्याच्या छातीवर रूळत होती. त्याच्या कपड्यावर साचलेल्या धुळीवरून तो फार दुरवरून आला असावा, असे दिसत होते.

त्याला पाहिल्यावर हरिदत्त गांगरून गेला आणि साहजिकच त्याचा हात खिशाकडे गेला. हरिदत्ताच्या जवळ आल्यावर आपली काठी इकडे तिकडे फिरवित तो म्हातारा म्हणाला, "बाळ, तुला इथं कुठं हिरवळीवर एक घंटा सापडली कां?"

हरिदत्त म्हणाला, "होय बाबा, - मला एक घंटा सापडली आहे, मी ती कोणालाच परत देणार नाही!"

"छे, छे ती माझी आहे. मला ती परत देऊन टाकणं फार चांगलं! अरे वेड्या, आज कितीतरी दिवस मी तिचा शोध करतो आहे. हे पहा, माझे धुळीनं भरलेले कपडे!" असे म्हाताऱ्याचे बोलणे हरिदत्ताला खरे वाटले नाही. तो थोड्या रागाने म्हणाला,

"पण बाबा, ती घंटा तुमचीच कशावरून? दोन दिवसांपूर्वी मला इथं एक सप्तरंगी रूमाल सापडला. एक लहान मुलगा रडत रडत आला आणि तो माझ्याजवळून घेऊन गेला."

"काल या इथंच मला एक सुंदर निळी टोपी सापडली. एक लहान मुलगी दुडूदुडू धावत आली, आणि ती माझी आहे म्हणून घेऊन गेली. त्या दोन्ही वस्तू मी परत दिल्या. आज मला एक घंटा सापडली. ती देखील मी परत देऊन टाकायची?"

"मला ती फार आवडली आहे. मी ती वाजविली की, माझ्या सर्व गाई

माझ्या सभोवती गोळा होतील: त्यांना हाका मारण्याचे काम पडणार नाही. राहूद्या ना बाबा, माझ्याजवळ ही घंटा!" मोठ्या आशेने हरिदत्ताने त्या म्हाताऱ्याकडे पाहिले. पण त्याने हरिदत्ताच्या विनवणीकडे दुर्लक्ष केले.

तो म्हणाला, "बाळ, जी वस्तू तुझ्या स्वतःची नाही, ती हक्काने तुला जवळ कशी ठेवता येईल? एवढा मोठा झालास. तुला हे समजत नाही का?" हरिदत्ताने मुकाट्याने खिशातून घंटा काढली. तिच्याकडे एकदा बघून त्याने ती म्हाताऱ्याच्या हातात दिली.

कोणतीही चांगली गोष्ट करावी. आपल्या कोणत्याही कृत्यापासून, दुसऱ्यास थोडासुद्धा त्रास होऊ देऊ नये. याची नेहमी काळजी घ्यावी, अशी हरिदत्ताला त्याच्या आईची शिकवण होती. त्याची इच्छा ती घंटा स्वतःजवळ ठेवावी अशी होती. पण त्याने ती देऊन टाकली.

त्याला वाटले, आपण जर तसे केले नाही तर, आपल्या हातून वाईट गोष्ट घडेल. तरी देखील घंटा परत करताना त्याने एक सुस्कारा टाकला. घंटा घेऊन पळून जाणे कितीतरी सोपे होते. तो म्हातारा आणि अशक्त माणूस त्याच्या मागे कधीच जोरात पळाला नसता, आणि हरिदत्ताला त्याने पकडले नसते. तरीपण हरिदत्ताने घंटा त्याला देऊन टाकली.

हरिदत्त खाली मान घालून घरी परत जायला निघाला. संध्याकाळ झाली होती. सर्व गाई गोळा करून त्याला घरी जायचे होते. पण त्या म्हाताऱ्याने खुणेने त्याला थांबविले.

तो म्हणाला, "सापडलेली वस्तू ज्याची त्याला परत करून तू आज एक चांगली गोष्ट केली आहेस. मला माझी घंटा मिळाली. तुला ती फार आवडलेली दिसते. पण मला ती तुला देता येत नाही. त्या घंटेच्या ऐवजी तू तुझ्या आवडीच्या तीन इच्छा सांग. मी त्या पूर्ण करीन."

"तीन इच्छा!" हरिदत्त आश्चर्याने गोंधळून म्हणाला, "म्हणजे, मी

बोलून दाखवलेली इच्छा पूर्ण होणार कां?"

"हो. अगदी तसंच, " तो म्हातारा शांतपणे म्हणाला.

" तुझ्या आवडीच्या तीन इच्छा सांग. त्याप्रमाणे सर्व होईलच."

हरिदत्ताला ती सगळी गंमत वाटली. तो विचार करण्यास मुळीच थांबला नाही. आवडीची इच्छा सांगण्यास कसला विचार करायचा? तो एकदम म्हणाला,

"मला राजा व्हावे असे वाटते"

"तू राजा होशील. आता दुसरी इच्छा सांग."

आता मात्र हरिदत्त विचार करण्यासाठी थोडा वेळ थांबला. त्याला वाटले, राजा झाल्यावर कोणती गोष्ट मिळणे अशक्य आहे. सर्व काही मिळेलच. तरी देखील तो म्हणाला,

"मी राजा झाल्यावर मला राहण्यास एक सुंदर राजवाडा पाहिजे."

"वा, तुझी ही इच्छा फार छान आहे! अजून एक इच्छा राहिली आहे. सांग, काय पाहिजे ते!"

"मी राजा होऊन सुंदर राजवाड्यात राहू लागलो म्हणजे पायीच कुठं कुठं जाणार! तर माझी तिसरी इच्छा अशी आहे की, मला एक उमदा छानदार घोडा मिळावा." असे म्हणून हरिदत्त त्या म्हाताऱ्याकडे पाहू लागला. त्याला ते सर्व अशक्य वाटले. तो म्हणाला,

"बाबा, खरोखर तुम्ही मी सांगितलेल्या माझ्या तीन इच्छा पूर्ण करणार?"

"पहा काय होतयं ते!" तो म्हातारा हसत म्हणाला. हरिदत्त मागे वळला, आणि एकदम दचकून उभा राहिला. त्याच्याजवळ सोन्या -चांदीने शृंगारलेला व खोगीर घालून सज्ज असा एक सुंदर काळा घोडा

उभा होता.

"हा पहा तुझा घोडा. त्यावर बसून तू आपल्या राजवाड्याकडे जा!" दूरवर मावळत्या सूर्यप्रकाशात चमकणाऱ्या उंच मनोऱ्याकडे आपल्या काठीने वाट दाखवित तो म्हातारा म्हणाला,

हरिदत्ताने घोड्याच्या पाठीवर थाप मारली तेव्हा तो घोडा वाऱ्याच्या वेगाने हरिदत्ताला घेऊन निघाला. लवकरच तो एका भव्य राजवाड्यासमोर येऊन उभा राहिला. समोर राजवाड्याच्या उतरत्या पायऱ्यांवर दोन्ही बाजूस शिपायांच्या रांगा उभ्या होत्या. त्यांनी हरिदत्ताला थाटाची सलामी दिली. हरिदत्त राजवाड्याच्या दाराजवळ येऊन पोहोचला तेव्हा एक शिपाई त्याचा घोडा धरण्यासाठी पुढे धावला आणि दुसऱ्याने त्याला खाली उतरण्यास मदत केली.

हरिदत्त पायऱ्या चढून आत गेला. आतील भव्य दालनात असंख्य स्त्री पुरूष जमले होते. हरिदत्तास पाहिल्याबरोबर सर्वांनी मोठ्या नम्रतेने त्याला नमस्कार करून त्याचे स्वागत केले, त्याचवेळी त्या भव्य दालनात एकच जयघोष झाला, "राजा चिरायू होवो!"

हरिदत्ताने न्यायाने आणि दयाळूपणाने पुष्कळ वर्षे राज्य केले. ज्या शेतकऱ्याजवळ तो रहात होता, त्याला हरिदत्ताने टेकडीच्या पायथ्याशी असलेली कुरणाची जागा बक्षिस देऊन सुखी केले.

◇◇◇◇

म. ग्रं. सं. ...
दा. क्र 2684 ... 9/9/83
विषय बा. वा

# ६. प्रॉसरपाईन

फुलाफळांची देवता, 'डिमिटर' हिला एक सुंदर मुलगी होती. तिचे नाव होते प्रॉसरपाईन.

एके दिवशी प्रॉसरपाईन आपल्या मैत्रिणीबरोबर रानात खेळत होती. त्याचवेळी पाताळ लोकचा राजा प्लुटो, चार काळ्या रंगाचे घोडे जोडलेल्या आपल्या काळ्या रथात बसून चालला होता. प्लुटोचा वर्ण काळाच होता. त्यामुळे सर्व देवतांना व अप्सरांना त्याची भीती वाटायची.

पाताळात सूर्यप्रकाश नाही, पक्ष्यांची मधुर किलबिल नाही, आणि फुले फळेही उगवत नाहीत, हे सर्वांना माहीत असल्यामुळे प्लुटोबरोबर त्याच्या पाताळलोकात जाऊन राहण्यास कोणीही खुशीने तयार नसे. ही गोष्ट प्लुटोलाही माहीत होती.

मैत्रिणीच्या मेळाव्यात खेळणाऱ्या प्रॉसरपाईनला पाहिल्यावर प्लुटो तिच्या सौंदर्याने मोहून गेला. तिला पाताळलोकची राणी करण्याचे त्याने ठरविले. ती खुषीने आपल्याबरोबर येणार नाही हे जाणून त्याने तिला पळवून नेण्याचे निश्चित केले.

प्लुटोने आपल्या रथातून खाली उडी घेतली. आणि तो धावत प्रॉसरपाईनकडे निघाला. त्याला पाहून भ्यालेल्या प्रॉसरपाईनच्या मैत्रिणी दूर पळून गेल्या. असहाय बिचारी प्रॉसरपाईन प्लुटोच्या हाती सापडली. त्याने तिला उचलून आपल्या रथात बसविले. आणि, त्याचा काळा रथ मोठ्या वेगाने पाताळलोकाकडे धावत निघाला.

वाटेत एक मोठी नदी लागली. ती खोल होती. शिवाय तिला पूरही आलेला होता. रथात बसून नदी पार करणे अशक्य आहे असे पाहून प्लुटोने आपल्याजवळ असलेली जादूची छोटी काठी हातात घेतली आणि तिचा

जमिनीवर प्रहार केला. त्या बरोबर जमिनीत एक मोठे विवर निर्माण झाले त्या विवरातून प्लुटोचा रथ पाताळलोकाकडे निघून गेला.

रथ विवरात शिरण्यापूर्वी बिचारी कष्टी झालेली प्रॉसरपाईन पृथ्वीवरील सूर्यप्रकाश डोळ्यात साठवून घेत होती. यापुढे त्याचे सुख तिला अंधाऱ्या पाताळलोकात मुळीच मिळणार नव्हते. आपल्या वियोगाने आईला फार दुःख होईल या विचाराने तिच्या डोळ्यात आसवे आली.

आपली वार्ता आईला कळावी म्हणून प्रॉसरपाईनने आपला कमरपट्टा नदीत फेकला. आणि तो आपल्या आईस नेऊन देण्यास तिने नदीत राहणाऱ्या एका अप्सरेला सांगितले.

इकडे डिमिटर शोकाकुल होऊन आपल्या लाडक्या कन्येच्या शोधार्थ चहूकडे वणवण भटकत होती. आपण फळफुलांची देवता आहो. हे ही ती विसरून गेली. फळफुलांकडे तिचे दुर्लक्ष झाले. झाडे वठू लागली. वेली सुकल्या. फुले कोमेजली. फळे पिकेनाशी झाली. पुष्कळ दिवस शोध करूनही प्रॉसरपाईनचा पत्ता लागेना. तेव्हा डिमिटर निराश झाली. तिला वाटले आपली मुलगी आपल्याला कायमची अंतरली.

एके दिवशी मोठ्या दुःखी मनःस्थितीत डिमिटर नदीकाठी भटकत असता, थोड्या अंतरावर तिला प्रॉसरपाईनचा कमरपट्टा दिसला. तो पाहून तिला फार आनंद झाला. धावतच ती कमरपट्ट्याजवळ गेली. तिने तो चटकन् उचलून घेतला.

तिला वाटले, प्रॉसरपाईन तिथेच जवळपास असेल! डिमिटर पुढे निघाली. आता ती फार थकली होती. जवळ असलेल्या टेकडीजवळ एक झरा झुळूझुळू वाहात होता. त्याच्या काठावर डिमिटर विसावा घेण्यासाठी बसली.

तेव्हा एकाएकी झऱ्याला वाचा फुटली. तो डिमिटरला म्हणाला, "ऐक. मी तुला काय सांगतो ते! तुझी लाडकी लेक प्रॉसरपाईन पाताळात आहे. ती आता प्लुटो राजाची राणी झाली आहे.'

प्रॉसरपाईनची वार्ता सांगितल्याबद्दल डिमिटरने झऱ्याचे आभार मानले. आणि ती तेथून झ्यूसकडे, देवांच्या राजाकडे गेली.

पाताळलोकातून आपल्या कन्येला परत पृथ्वीवर आणावे अशी डिमिटरने झ्यूसला नम्र विनंती केली.

तेव्हा झ्यूस डिमिटरला म्हणाला, "तुझ्या मुलीनं पाताळलोकांत काही खाल्लं नसेल तर ती पृथ्वीवर परत येऊ शकेल."

नंतर प्रॉसरपाईनला पृथ्वीवर तिच्या आईकडे परत पाठवावे असा संदेश हरमिस नावाच्या आपल्या दूताजवळ देऊन झ्यूसने त्याला प्लुटोकडे पाठविले.

प्रथम प्लुटो प्रॉसरपाईनला तिच्या आईकडे जाण्यास परवानगी देईना. पण पाताळात गेल्यावर प्रॉसरपाईनने डाळिंबाचे सहा दाणे खाल्ले होते. म्हणून असा निर्णय घेतला गेला की, वर्षातून सहा महिने प्रॉसरपाईनने पाताळात प्लुटोजवळ राहावे व उरलेले सहा महिने पृथ्वीवर आपल्या आईजवळ राहावे.

याच कारणाने ऋतूत बदल होतो. अशी प्राचीन ग्रीक लोकांची समजूत होती. त्यांना वाटे, उन्हाळ्याचे उबदार सहा महिने प्रॉसरपाईनचे वास्तव्य पृथ्वीवर आहे. त्यामुळे फुलाफळांना बहर येतो आणि हिवाळ्याचे थंडगार सहा महिने प्रॉसरपाईन पाताळात प्लुटोजवळ राहत असल्याने, झाडे निष्पर्ण होतात. आणि फुले दुःखाने कोमेजून गळून पडतात.

◇◇◇◇

# ७. युक्तीचे बळ

एका जुनाट पडक्या वाड्याच्या आवारात उंदरांची भली मोठी सभा भरली होती. एका महत्वाच्या प्रश्नावर निर्णय घ्यावयाचा असल्यामुळे त्या सभेला उंदीर गावातील समस्त उंदीर हजर राहिले होते. एवढेच नव्हे तर आसपासच्या वस्तीवरले उंदीरही मोठ्या संख्येने तिथे दाखल झाले होते.

लहान मोठ्या नाना रंगाच्या उंदरांच्या त्या जंगी सभेत तरूण उंदरांची संख्या जास्त होती. त्यांची धावपळ व बडबड जास्त प्रमाणात चालू होती. पण अध्यक्षपदावर म्हणून मातीच्या एका ढिगाऱ्यावर एक म्हातारा उंदीर आपले शेपूट सावरीत येऊन बसताच एकदम चहूकडे शांतता पसरली.

आपली तीक्ष्ण नजर उंदराच्या जमावावरून फिरवीत तो म्हातारा उंदीर म्हणाला, 'मित्रहो, पंधरा दिवसांपूर्वी आपल्या जमातीच्या एका लग्नप्रसंगी आपल्या शत्रूनं आपल्यावर अचानक हल्ला केला होता. त्यावेळी शत्रूची संख्या दहा पंधराच होती. पण आपली संख्या शंभर दिडशे असूनसुध्दा आपला धुव्वा उडाला. जीव वाचविण्यासाठी सैरावैरा पळताना आपल्याला भुई थोडी झाली. आपली बीळं अजिंक्य म्हणून आपण जिवंत राहिलो. त्या गोंधळात नवरा-नवरीचं काय झालं ते उघडपणे कुणालाही सांगता येत नाही.' मध्येच समोर बसलेले उंदीर ओरडले, 'त्या दुष्ट मांजरिटल्यांना हाणून पाडा!'

'सगळ्या मांजराचा नायनाट होवो!' उजव्या बाजूस बसलेले उंदीर ओरडले. त्याबरोबर डाव्या बाजूच्या उंदरांनी गिल्ला केला. 'सगळी मांजर जात या जगातून नाहीशी होवो!' 'असा आरडाओरडा करून उपयोग काय?' म्हातारा उंदीर म्हणाला, 'नुसत्या घोषणांनी आपल्या शत्रूचा नाश होणार नाही. काही जबरदस्त उपाय योजना केली पाहिजे!'

'मांजराविरूध्द युध्द पुकारा!' काही तरूण गुंड उंदीर म्हणाले. तेव्हा सगळ्या सभेत खळबळ उडाली. जो तो आपले बरे वाईट मत आपल्या शेजाऱ्याजवळ प्रगट करू लागला. सभेत गोंधळ माजू लागला. ते पाहून म्हातारा उंदीर जोराने किंचाळला. 'शांत रहा! शांत रहा! काय करायचं ते आपण सर्वांनी शांतपणे विचार करून ठरवायचं आहे. कोणत्याही गोष्टीत उतावीळपणा घातक ठरतो.'

'बरोबर आहे, बरोबर आहे.' काही वयस्कर उंदीर म्हणाले. 'कोणतीही गोष्ट दमानं घेतली पाहिजे!'

'तुम्ही दमच घेत बसा. कारण तुमच्यात दम नाही.' पुंड, आडदांड उंदरांचा पुढारी मोठ्यांदा म्हणाला, 'मी माझ्या पंचवीस दोस्तांच्या तुकडीसह आत्ताच्या आत्ता मांजरगावांवर धाड घालण्यासाठी जातो. आणि तिथं जेवढी मांजरं सापडतील त्या सर्वांचा फडशा पाडून परत येतो. चला रे दोस्तांनो!' असे म्हणून तो पुंड उंदीर तरातरा चालू लागला. त्याच्या मागून त्याचे पंचवीस दोस्त निघाले.

तेव्हा अध्यक्षपदावरचा म्हातारा उंदीर ओरडला, 'थांबा, मुर्खासारखं अविचारानं वागू नका. फुकट जीव गमवाल! त्या दुष्ट मांजराच्या अंगावर तुम्ही चाल करून जाण्यापूर्वीच ती तुमच्यावर तुटून पडतील. मग तुमचा मागमूसही राहणार नाही. त्या दुष्टांच्या नाशाचा आपण एकजुटीनं विचार केला पाहिजे.'

'असू दे आम्ही मूर्ख! तुम्ही फार शहाणे आहात. तेव्हा खुशाल बसा तुम्ही विचार करीत. तोपर्यंत आम्ही रणमैदान गाजवून येतो.' असे म्हणून तो पुंड उंदीर आपल्या दोस्तांसह उड्या मारीत चालता झाला.

तेव्हा काही उंदीर म्हणाले, 'छान झालं! पुंड्यानं अध्यक्षांची चांगलीच जिरवली.' दुसरे काही उंदीर म्हणाले, अध्यक्षांचं सांगणं अगदी शंभर टक्के बरोबर आहे. यापुढं पुंड्या आणि त्याचे दोस्त यांचं एक नखही आपल्या नजरेला पडणार नाही.'

तेवढ्यात 'शांत रहा, शांत रहा' असे म्हणत म्हातारा उंदीर पुढे बोलू लागला, 'अलीकडची पोरं ही अशी! अविचारानं वागून स्वतःचं अकल्याण करून घेणारी, शहाणपणाचा नुसता आव आणून आम्हाला मूर्ख समजणारी. जगात भल्यापेक्षा बुरे अनुभव घेत आम्ही म्हातारे झालो. पण आमचं कळकळीचं सांगणं ऐकतो कोण?'

'आम्ही ऐकतो, आम्ही ऐकतो' असे सभेतले उंदीर एकमुखाने ओरडले. तुम्ही जे सांगणार ते आपणा सर्वांच्याच कल्याणाचं असणार!'

'होय. अगदी बरोबर!' म्हातारा उंदीर ठासून म्हणाला. 'मी असं म्हणतो की, आपली संख्या कितीही मोठी असली तरी आपण सर्व मांजरांचा नाश करू शकणार नाही. त्यांचा काटा आपण मोठ्या युक्तीनं काढला पाहिजे. तेव्हा-'

'आपण आपल्या शत्रूशी गनिमी काव्यानं लढलं पाहिजे!' समोरच्या रांगेत बसलेला एक तल्लख उंदीर म्हणाला.

'शाब्बास! अगदी बरोबर सांगितलंस तू! हे तुला कसं सुचलं?' म्हाताऱ्या उंदरानं विचारले.

'मराठ्यांच्या इतिहासावरून,' तो तल्लख उंदीर मोठ्या ऐटीत म्हणाला, ' तो इतिहास मला एवढा आवडला की त्या पुस्तकाचं एकही पान मी कुरतडलं नाही.'

'फार चांगलं केलस तू! त्या इतिहासाचं आपण कधीतरी सामुदायिक वाचन करू या. त्यामुळं आपल्यातले मठ्ठ व अविचारी उंदीर शहाणे व विचारी होतील. जे भित्रे आहेत ते धीट होतील.' थोडे थांबून म्हातारा उंदीर पुढे म्हणाला, 'बरं का मित्रांनो, आपल्या शत्रूशी गनिमी काव्यानं लढून त्याला सळो की पळो करूण सोडणं हाच एक सर्वात चांगला उपाय आहे. ह्याप्रमाणं मी एक योजना तुम्हाला सुचवितो. आपलं गाव व मांजरगाव यांच्यामध्ये एक ओढा आहे. आता उन्हाळ्यात तो कोरडा ठणठणीत पडला आहे. त्यातून असं एक भुयार तयार करू या की, जे

मांजरगावच्या वरच्या बाजूस उघडेल. मग पावसाळ्यात धो धो पाऊस पडू लागला म्हणजे -'

'वा. किती छान योजना!' सगळे उंदीर उद्‌गारले. 'आम्ही आत्ताच त्या कामाला सुरूवात करतो.' असे म्हणून सभास्थानी जमलेल्या उंदरांच्या झुंडी मोठ्या आनंदाने उड्या मारीत ओढ्याकडे निघाल्या. तेव्हा जवळपासच्या शेतात पुंडगिरी करणारे बरेच लठ्ठ उंदीर त्या झुंडीत सामील झाले.

ओढ्याकाठी आल्यावर म्हाताऱ्या उंदराच्या देखरेखीखाली भुयार तयार करण्याचे काम जोराने सुरू झाले. उन्हाळा संपला आणि त्याचवेळी असंख्य उंदरांनी अहोरात्र राबून भुयाराचे काम पूर्ण केले.

मृग नक्षत्राला सुरूवात झाली. आकाशात काळ्याभित्र मेघांचा गडगडाटी संचार सुरू झाला. मोठ्या दिमाखात मांजरगावावर धाड घालण्यास गेलेला पुंड्या एके दिवशी संध्याकाळी एकटाच मोठ्या कष्टाने उंदीरगावात परत आला. तो एका पायाने लंगडा झाला होता. आणि त्याच्या शेपटीचा तर पत्ताच नव्हता. उंदीर गावावर फार मोठी मांजर धाड येणार अशी भयंकर बातमी त्याने आणली होती.

त्या भयंकर बातमीने सगळ्या उंदरांचे धाबे दणाणले होते. पहाटे गाव सोडून जावे असे त्यांनी ठरविले. पण त्यांच्या सुदैवाने त्या रात्री पाऊस कोसळू लागला. व तसाच तो रात्रभर कोसळत राहिला.

सकाळी आकाश निवळून पाऊस थांबल्यावर उंदीरगावातले झाडून सगळे मोठ्या उत्सुकतेने एका टोकावर चढून गेले. आणि त्यांची दृष्टी एका विलक्षण दृश्यावर खिळून राहिली.

ओढ्याच्या जागी खळाळणाऱ्या शेंदरी पाण्याची नदी दिसत होती. आणि त्या नदीला भेटण्यासाठी मांजरगावच्या वरच्या बाजूस उगम पावलेला एक ओढा मांजरगाव होते की नव्हते करून धावत येत होता.

◇ ◇ ◇ ◇

# ८. मूषकवाणी

प्रतिष्ठान नगरात एक वैश्य रहात होता. त्याचे नाव होते मूषकवाणी.

एकदा काय झाले, त्याच्या एका मित्राने त्याला विचारले, 'तुला मूषकवाणी असे का म्हणतात? कारण अशाप्रकारचे नाव लहानपणी कुणी ठेवत नाही. यापेक्षा पाळण्यातलं तुझं नाव चांगलंच असलं पाहिजे!'

'खरं आहे तुझं म्हणणं,' मूषकवाणी म्हणाला, 'पाळण्यात ठेवलेल्या माझ्या नावापेक्षा मूषकवाणी हेच नाव मला फार आवडतं. त्याचा मला अभिमान वाटतो. तुला आश्चर्य वाटेल, पण खरं सांगायचं म्हणजे एका मेलेल्या मूषकामूळेच मी धनवंत झालो आहे.'

असे मूषकवाण्याचे शब्द ऐकून त्याचा मित्र आश्चर्यचकित होऊन म्हणाला, 'अस्सं! ते कसं काय?'

तेव्हा मूषकवाणी म्हणाला, 'ऐक ती कथा.'

'मी अगदी लहान होतो, तेव्हा माझे वडील वारले. आमच्या नातलगांनी गोड बोलून आमचं सर्व धन हिरावून घेतलं. घरी माझी आई आणि मी. कोणाही नातलगाने, आम्ही अगदी निराधार परिस्थितीत असतानासुध्दा, आम्हाला एका पैशानेही मदत केली नाही. उलट नातलगांनी आम्हाला फसवून आमच्याजवळ होते नव्हते ते सर्व लांबवले.

'मग माझ्या पालनपोषणासाठी आईला हालअपेष्टा सहन करीत मोलकरणीचे काम करणे भाग पडले. मी अगदीच लहान. तेव्हा निराधार स्थितीत एकटं राहणं सुरक्षित न वाटल्याने आम्ही आमच्या वडिलांच्या

कुमारदत्त नावाच्या मित्राच्या घरी राहू लागलो. तिथे मी शाळेत जाऊ लागलो. लिहिणं वाचणं आणि गणित शिकलो. पुढे एके दिवशी आई मला म्हणाली, 'बाळा, तू वैश्य आहेस. व्यापार सुरू करणं हे आपलं ध्येय. तेव्हां तू आता काही उद्योगधंदा सुरू कर!'

तेव्हा मी म्हणालो, 'आई, तुझं म्हणणं खरं आहे पण आपण फार गरीब. व्यापार सुरू करण्याकरिता आपल्यापाशी भांडवल कुठाय?'

तेव्हा माझी आई म्हणाली, 'या नगरात विशाखिल नावाचा एक श्रीमंत वाणी आहे. तो गरीब आणि कुलीन वैश्यांना व्यापाराकरिता भांडवल देण्यास नेहमी तयार असतो. तू त्याच्याकडे जा. आणि व्यापारासाठी थोडे भांडवल मागून घे!'

दुसऱ्या दिवशी आईने सांगितल्याप्रमाणे मी विशाखिल वाण्याकडे गेलो. त्यावेळी तो एका वैश्याच्या मुलाशी रागारागाने बोलत त्याची कानउघाडणी करीत होता. तो त्याला मोठ्यांदा म्हणत होता,

'मूर्खा, आजपर्यंत तुला मी वेळोवेळी व्यापाराकरिता पुष्कळ भांडवल दिलं. पण तू डोक ठिकाणावर ठेऊन कौशल्यानं व्यापार करून ते भांडवल वाढविलं नाहीस. उलट तू ते भांडवलंच गमावून बसलास. अरे, शहाणा माणूस कुठल्याही भांडवलावर उद्योगधंदा करू शकतो. आणि आपले हित साधू शकतो. तो बघ, समोर एक उंदीर मरून पडलाय. तो मेलेला उंदीर हेच भांडवल समजून एखादा चतुर वाणी खासच श्रीमंत होईल!' असे विशाखिलाचे शब्द ऐकून मी चटकन पुढे झालो आणि त्याला म्हणालो,

'महाराज, तुम्ही योग्य बोललात. मी हा मेलेला उंदीर तुमच्याकडून भांडवल म्हणून घेतो.' असे बोलून मी तो मेलेला उंदीर घेतला. आणि तो आपल्या खाती मांडावयास सांगून मी तेथून निघालो.

माझे ते वेडगळपणाचे कृत्य पाहून तेथे जमलेले लोक खो खो करून हसू लागले. त्यांच्याकडे मुळीच लक्ष न देता मी तेथून सरळ बाजारात गेलो. तिथे एका मोठ्या वाण्याला त्याच्या मांजराकरिता म्हणून मी तो उंदीर दोन मुठी चण्याला विकला. नंतर मी घरी गेलो. चणे भाजून त्याचे फुटाणे केले. नंतर एक पाण्याची घागर आणि ते फुटाणे घेऊन नगराबाहेर गेलो.

तिथे रहदारीच्या मार्गावर एका पिंपळवृक्षाच्या सावलीत मी बैठक मारली. त्या ठिकाणी, अरण्यातून लाकडाच्या मोळ्या डोक्यावर घेऊन येणारे मोळीवाले थकल्यामुळे, विश्रांती घेण्यासाठी आपल्या डोक्यावरील मोळ्या खाली ठेऊन, सावलीत बसत असत. त्यांना मी मोठ्या आपुलकीने थोडेसे फुटाणे आणि थंड पाणी देऊ लागलो. तेव्हा तृप्त झालेले मोळीवाले मला आपल्या मोळीतील दोन दोन लाकडे देऊ लागले.

संध्याकाळी मी त्या सर्व लाकडांची मोळी बांधून बाजारात जाई आणि ती विकून त्या पैशाचे पुन्हा चणे विकत घेई. दुसऱ्या दिवशी पुन्हा चण्याचे फुटाणे करून आणि पाणी घेऊन मी त्याच झाडाखाली बसे. त्यादिवशी माझ्यापाशी जास्त फुटाणे असल्यामुळे मला जास्त लाकडे मिळत.

असा माझा उपक्रम काही दिवस चालला. माझ्यापाशी पुष्कळ लाकडे जमू लागली. पुढं काय झालं की दोन तीन दिवस खूप पाऊस पडला. त्यामुळे जळण मिळेनासे झाले. सरपणाचा भाव वाढला. त्या उद्योगात मला खूपच फायदा झाला.

नंतर मी एक दुकान विकत घेतले. आणि मोठ्या चातुर्याने व्यापार करून एक धनाढ्य व्यापारी झालो. मग मी एक सोन्याचा उंदीर तयार करून घेतला. आणि तो मोठ्या आदराने विशाखिलास परत दिला.

तेव्हा त्याला फार आनंद झाला. आणि त्याने आपल्या मुलीचा विवाह माझ्याशी करून दिला. जन्मापासून मी दरिद्री होतो. पण मोठ्या चातुर्याने आणि काटकसरीने व्यापार करून आज मी मोठा लक्ष्मीवंत झालो आहे. एका मेलेल्या मूषकाच्या भांडवलावर व्यापार करून मी श्रीमंत झालो. म्हणून लोक मला 'मूषकवाणी' असे म्हणतात.

अशी मूषकवाण्याची कथा ऐकून त्याच्या मित्रास आश्चर्य वाटल्यास नवल ते काय?

◇◇◇◇

# ९. चतुरकाचे चातुर्य

**भ**द्रावती नगरात राहणारा चतुरक नावाप्रमाणेच मोठा चतुर व धुर्त होता. पण तो ज्या निर्बुध्द व्यापाऱ्याकडे नोकरीस होता. त्याला त्याच्या गुणाची कदर नव्हती. कमी पगार देऊन आपण चतुरकाकडून जास्त काम करून घेतो, म्हणून तो स्वतःवरच फार खूष होता. बिचाऱ्या चतुरकाला दुसरी एखादी चांगली नोकरी मिळाली नसल्याने, अडल्या नारायणाप्रमाणे त्याला त्या कंजूष व्यापाऱ्याचे पाय धरावे लागले होते. कमी पगाराच्या बळावर, संसाराचा गाडा ओढणे, चतुरकाला दिवसेंदिवस कष्टाचे वाटू लागले. त्याला वाटले, राजा भद्रसेनाच्या भेटीने कदाचित् आपले दैव उजाडेल!

राजाच्या भेटीत त्याच्याशी काय बोलायचे ते मनाशी ठरवून, एकेदिवशी सकाळी चतुरक राजवाड्याकडे गेला. राजवाड्याच्या प्रवेशद्वाराशीच एका राजसेवकाने त्याला अडविले आणि विचारले,

'कोण तू? काय काम आहे?'

'माझं नाव चतुरक. मी एक नगरवासी आहे. मला महाराजांना भेटायचं आहे. एक महत्वाची गोष्ट त्यांच्या कानावर घालायची आहे.'

'सध्या महाराज फार कामात आहेत,' राजसेवक म्हणाला, 'त्यांना भेटण्याची कुणालाही परवानगी नाही. पण खरं सांग, कशासंबंधी तुला त्यांना भेटायचं आहे?'

'सांगतो,' चतुरक म्हणाला, 'काल रात्री मला एक स्वप्न पडलं. ते महाराजांसंबंधी होतं. ते महाराजांच्या कानी घालावं. असं मला वाटतं. कदाचित त्यातून काहीतरी चांगलंच निष्पन्न होईल!'

'काय म्हणालास तू! स्वप्न?' राजसेवक उद्गारला, 'किती वेडा आहेस तू! अरे, आजकाल कुणीही माणूस स्वप्नावर विश्वास ठेवत नाही. तुझ्या स्वप्नावर महाराज विश्वास ठेवतील, असं का तुला वाटतं?'

'भल्या माणसा,' चतुरक गंभीर मुद्रेने म्हणाल, 'स्वप्नाची अशी थट्टा करू नकोस. स्वप्न कधी कधी खरी ठरतात, हे माहीत नाही का तुला? माझी अशी खात्री आहे की, महाराजांचा माझ्या स्वप्नावर विश्वास बसेलच.'

'फार शहाणा आहेस, जा. चालू लाग.' राजसेवक दरडावणीच्या स्वरात म्हणाला, 'तुझ्यासारख्या स्वप्नाळूंची भेट घेण्यास महाराजांना सवड नाही!'

'ठीक आहे, मी जातो!' चतुरक म्हणाला, 'पण लक्षात ठेव, 'कोणत्या ना कोणत्या उपायानं मी महाराजांची भेट घेईन, आणि जेव्हा त्यांची भेट होईल, तेव्हा आपल्या सेवकानं मला हाकलून दिलं, असं मी त्यांना सांगेन. राजभेटीची इच्छा करणाऱ्याला राजसेवकाने कधीही हाकलून देऊ नये समजलं?'

चतुरकाचे असे बोलणे ऐकून राजसेवक काही क्षण विचारात पडला. त्याला वाटले, महाराजांना या माणसाला भेटावसं वाटलं तर आपण महाराजांची आज्ञा घ्यावी, हे बरं. असा विचार करून तो चतुरकाला म्हणाला,

'थांब, मी महाराजांची आज्ञा घेऊन येतो!' एवढे बोलून तो राजसेवक भद्रसेन राजाकडे गेला. आणि त्याला म्हणाला,

'महाराज, चतुरक नावाचा कोणी एक स्वप्नाळू माणूस आपल्या भेटीची आज्ञा मागतोय्!'

'त्याने स्वतःला पडलेल्या स्वप्नासंबंधी तुला काही सांगितलं का?'

'होय महाराज,' राजसेवक म्हणाला, 'काल रात्री त्याला पडलेल्या स्वप्नाबद्दल तो बोलला, एवढं मात्र खरं!'

'अरे,' राजा हसून म्हणाला, 'मी पाहिलेल्या स्वप्नावर माझा विश्वास बसत नाही, तर त्या माणसाच्या स्वप्नावर माझा विश्वास कसा बसेल?'

अगदी तसंच मी त्या स्वप्नाळूला सांगितलं, तेव्हा तो म्हणाला, 'राजभेटीची इच्छा करणाऱ्याला राजसेवकाने कधीही हाकलून देऊ नये!'

'खरचं आहे त्याचं म्हणणं,' भद्रसेन म्हणाला, 'भेटण्यास आलेल्या कुणाही माणसाची प्रजाहितदक्ष राजाने भेट घेतलीच पाहिजे. जा, त्या स्वप्नाळू माणसाला माझ्याकडे घेऊन ये!'

राजाज्ञेप्रमाणे राजसेवकाने चतुरकाला भद्रसेनापुढे आणताच भद्रसेन त्याला म्हणाला, 'भल्या माणसा, सध्या मी कामाच्या गर्दीत आहे. तुझ्या स्वप्नाबद्दल तुला काय सांगायचं आहे, ते मला सत्वर सांग!'

'महाराज,' चतुरक म्हणाला, 'आपणाला आज रात्री स्वप्न पडणार आहे, असं काल रात्री मला एक स्वप्न पडलं. स्वप्नात कुणीतरी आपणास चाळीस मौल्यवान रत्न देईल. त्याचा अर्थ म्हणजे यापुढं आणखी चाळीस वर्ष राजपद भूषवाल!'

'अस्सं!' भद्रसेन उद्‌गारला, 'हे स्वप्न चांगलचं आहे की! असं स्वप्न मला पडलं तर, मी तुला खूप द्रव्य देईन!'

'महाराज फार उदार आहेत,' चतुरक म्हणाला. 'पण आपल्या भेटीनंतर मी रिकाम्या हातांनी घरी परत गेलो तर, माझी कुटुंबीय मंडळी काय म्हणतील!'

'मग मी काय करावं, असं तुला म्हणायचंय?' भद्रसेनने विचारले.

'महाराज, स्पष्ट बोलतो, क्षमा करा,' चतुरक म्हणाला, 'आता मला

फक्त पन्नास मोहरा द्या.'

'पण तुझं स्वप्न खोटं ठरलं तर?' भद्रसेनानं शंका प्रदर्शित केली.

'आपण दिलेल्या पन्नास मोहरा मी आपणास परत आणून देईन.'

'त्याची हमी कोण घेणार?' भद्रसेनाने विचारले.

चतुरकाने जवळच उभ्या असलेल्या राजसेवकाकडे पाहिले. आणि तो म्हणाला, 'हा भला माणूस आपणास पन्नास मोहरा देण्याची हमी देईल.'

'काय आहे का रे तुझी तयारी?' भद्रसेनाने आपल्या सेवकास विचारले. तेव्हा गोंधळलेल्या राजसेवकाला काय बोलावं, ते समजेना. पण काही क्षण विचार करून तो म्हणाला,

'होय महाराज, चतुरकानं आपणास पन्नास मोहरा परत दिल्या नाहीतर, मी त्यांची भरपाई करीन.'

नंतर राजाज्ञेने चतुरकाला पन्नास मोहरा दिल्या गेल्या. मग मोठ्या नम्रतेने भद्रसेनाचे आभार मानून चतुरक घराकडे परतला.

चतुरकाने सांगितल्याप्रमाणे, त्याच दिवशी रात्री आपणास कोणी चाळीस रत्ने दिल्याचे स्वप्न भद्रसेनाला पडले. दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून चतुरक राजाची भेट घेण्यासाठी गेला. राजा भद्रसेन त्याची वाट पहात होताच. चतुरकाला पाहताच तो म्हणाला, 'भल्या माणसा, तू सांगितल्याप्रमाणं काल रात्री मला स्वप्न पडलं.'

'महाराज, तसं ते पडणार हे मला माहित होतंच.' चतुरक नम्रपणे म्हणाला. भद्रसेन चतुरकावर खुष झाला. त्याने बक्षिस म्हणून चतुरकाला शंभर मोहरांची एक थैली दिली.

भद्रसेनने दिलेले बक्षिस घेऊन चतुरक राजवाड्याबाहेर पडताच राजसेवकाने त्याला गाठले आणि विचारले, 'खरंच, तुला मौल्यवान

रत्नाचं स्वप्न पडलं होत?'

'छे, मुळीच नाही,' चतुरक हसत म्हणाला.

'पण तू सांगितल्याप्रमाणं महाराजांना मौल्यवान रत्नाचं स्वप्न पडलं की! असं कसं झालं, हे मला समजलं नाही.' गोंधळलेला राजसेवक म्हणाला.

'अरे, महाराजांना तसं स्वप्न पडणारच. त्यात काय आश्चर्य! 'मनी वसे, ते स्वप्नी दिसे.' मौल्यवान रत्नाचं स्वप्न पडेल असं मी महाराजांना सांगितलं होतं. आणि महाराज त्यावर दिवसभर नव्हे तर, रात्री झोपेपर्यंत विचार करीत राहिले. मग रात्री झोपेत त्यांना तसं स्वप्न पडेल, नाहीतर काय होईल?'

असे चतुरकाचे बोलणे ऐकून, राजसेवक त्याच्याकडे आश्चर्याने बघतच राहिला. तेव्हा चतुरक गंभीर मुद्रेने त्याला म्हणाला, 'हे तू महाराजांना सांगू नकोस. मी मोहरा परत देऊ शकलो नाही तर त्यांची भरपाई करण्याची हमी तू घेतलीस. म्हणून खरं काय, ते मी तुला स्पष्टपणे सांगितलं, समजलं?'

अर्थात खरे काय ते भद्रसेनाला कधीच कळले नाहीत. राजकृपेने चतुरकाला दरबारात एक चांगले मानाचे स्थान प्राप्त झाले. चतुरकाला दैवाने प्रसाद दिला तो असा!'

◇◇◇◇

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. 2685 दि. 9/1/03
विषय ना.वा. ४८
BVBK-0402745

-: समाप्त :-